निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
रविवार
०८ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३४३ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# अमेरिकेसोबतच्या व्यापार करारानंतर भारतात काय स्वस्त?

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** भारत आणि अमेरिका यांच्यात नुकत्याच झालेल्या एका महत्त्वाच्या व्यापार करारामुळे दोन्ही देशांतील व्यापार अधिक मजबूत होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या चर्चेनंतर हा करार झाला. अमेरिकेने भारतावर लादलेली अतिरिक्त २५ टक्के शुल्क काढून टाकली आहे, ज्यामुळे भारतीय वस्तू अमेरिकेत स्वस्त होणार आहेत. मात्र, भारताने रशियाकडून तेल खरेदी करू नये, अशी अट आहे. जर भारताने तसे केले तर शुल्क पुन्हा लागू होईल. हा करार लागू झाला असून, अमेरिकेच्या वाणिज्य विभागाकडून यावर देखरेख ठेवली जाणार आहे. हा करार दोन्ही देशांसाठी ऐतिहासिक आहे, असं वाणिज्य मंत्री पीयूष गोयल म्हणाले. यामुळे भारतीय निर्यातदारांना जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेत प्रवेश मिळणार आहे. यामुळे भारतात कोणत्या वस्तू स्वस्त होतील? सविस्तर जाणून घेऊया.

करारातील मुख्य अटी

या करारानुसार भारत रशियाकडून थेट किंवा अप्रत्यक्षपणे पेट्रोलियम उत्पादने खरेदी करणार नाही. त्याबदल्यात अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील अतिरिक्त शुल्क हटवले. भारत अमेरिकेकडून ५०० अब्ज डॉलरच्या ऊर्जा उत्पादने, विमाने, मौल्यवान धातू आणि तांत्रिक वस्तू आयात करेल. अमेरिका भारतीय जेनेरिक औषधे, हिरे, दागिने आणि विमानाचे भाग यांवर शुल्क कमी करेल. भारत अमेरिकेकडून जनावरांच्या चाऱ्यासाठी विशेष सवलती दिली जाईल. मात्र, गहू, तांदूळ, दूध, चीज आणि केळी यांसारख्या पारंपरिक भारतीय पिकांच्या आयातीला परवानगी नाही, ज्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. जनावरांच्या चाऱ्यातील कमतरता दूर करण्यासाठी अमेरिकेकडून इथेनॉल उपउत्पादने आणि बाजरी आयात केली जाईल.

भारतात काय स्वस्त?

या करारामुळे भारतात अनेक आयातित वस्तू स्वस्त होतील. अमेरिकेकडून येणारे फळे, सुकामेवा, सोयाबीन तेल आणि मद्य यांवर आयात शुल्क कमी होईल. यामुळे बाजारात या वस्तूंच्या किंमती कमी होतील. जनावरांच्या चाऱ्याची आयात वाढेल, ज्यामुळे दुग्ध आणि पशुपालन क्षेत्रातील खर्च कमी होईल. आर्थिक सर्वेक्षण २०२५-२६ नुसार, ७५ टक्के पशुपालकांना चाऱ्याची कमतरता भासते, ज्यामुळे पशुधन वाढवणे कठीण होते. याशिवाय यंत्रसामग्री, इलेक्ट्रॉनिक्स आणि इतर फळे स्वस्त होतील, कारण भारत सरकारने आयात अडथळे दूर केले आहेत.

भारतीय निर्यातदारांसाठी फायदे

हा करार भारतीय निर्यातदारांसाठी मोठा फायदा आहे. लघु आणि मध्यम उद्योग, शेतकरी, मच्छीमार, महिला आणि युवकांना अमेरिकेच्या ३० ट्रिलियन डॉलरच्या बाजारपेठेत सहज प्रवेश मिळेल. यामुळे निर्यात वाढेल आणि लाखो नवीन रोजगार निर्माण होतील. कापड, चामडे, पादत्राणे, रबर, रसायने आणि घरगुती वस्तू यांवर अमेरिकेत १८ टक्के कर लागेल, जो चीन किंवा व्हिएतनामपेक्षा स्पर्धात्मक आहे. जेनेरिक औषधे, रत्ने आणि दागिने यांसारख्या क्षेत्रांना विशेष सवलती मिळतील.

कोणत्या क्षेत्रांवर परिणाम?

ऑटोमोबाईल, विमानन भाग, जेनेरिक औषधे आणि दागिने क्षेत्रांना या कराराचा थेट फायदा होईल. जनावरांच्या चाऱ्याच्या आयातीमुळे दुग्ध उत्पादकांना दिलासा मिळेल. पारंपरिक शेती क्षेत्र सुरक्षित राहील, कारण अमेरिकन उत्पादने त्यात येणार नाहीत. यामुळे शेतकऱ्यांची चिंता दूर होईल. एकंदरीत, हा करार पुरवठा साखळी मजबूत करेल आणि आर्थिक सुरक्षेसाठी मदत करेल.

भविष्यात काय?

दोन्ही देश आर्थिक सुरक्षा, पुरवठा साखळी आणि तंत्रज्ञान क्षेत्रात अधिक सहकार्य करतील. जीपीयू आणि डेटा सेंटरसाठी प्रगत उत्पादने यात सामील आहेत. तिसऱ्या देशांच्या अनुचित व्यापार धोरणांना सामोरे जाण्यासाठी एकत्र काम करतील. हा करार द्विपक्षीय व्यापार वाढवेल आणि भारत-अमेरिका संबंध अधिक मजबूत करेल. यामुळे भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढेल आणि जागतिक स्तरावर मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येतोय.



## संक्षिप्त

### ५ टक्के आरक्षणाचे लाभ आता 'ब्लॉकचेन'मुळे मिळणार जलदगतीने!

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/**राज्यातील गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय नोकऱ्यांमध्ये मिळणाऱ्या ५ टक्के आरक्षणाची प्रक्रिया आता अधिक पारदर्शक आणि वेगवान होणार आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने या प्रक्रियेत ब्लॉकचेन (Blockchain) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांसारख्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास अधिकृत मान्यता दिली आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी या महत्त्वपूर्ण निर्णयाची माहिती दिली असून, यामुळे खेळाडूंना पडताळणीसाठी होणारा मनस्ताप आता थांबणार आहे.

**खेळाडूंसाठी मोठी बातमी:**

प्रणाली कशी काम करणार?

या नवीन प्रणालीमुळे खेळाडूंना त्यांच्या प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी वारंवार सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत. त्याची कार्यपद्धती खालीलप्रमाणे असेल-संघटनांसाठी बंधनकारक नियम: राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आयोजित करणाऱ्या अधिकृत




क्रीडा संघटनांना स्पर्धा संपल्यापासून ७ दिवसांच्या आत अंतिम निकाल, सहभागी खेळाडूंची यादी आणि गुणपत्रिका डिजिटल स्वाक्षरीसह पोर्टलवर अपलोड करावी लागेल.

डिफॉल्टर यादी: विहित मुदतीत माहिती न भरणाऱ्या संघटनांना 'डिफॉल्टर' घोषित केले जाईल, ज्यामुळे पारदर्शकता टिकून राहील.

ई-प्रमाणपत्र पडताळणी: खेळाडूंनी त्यांचे 'क्रीडा ई-प्रमाणपत्र' संकेतस्थळावर अपलोड केल्यावर, ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे त्याची आपोआप पडताळणी होईल. खेळाडूने दिलेली माहिती आणि संघटनेने दिलेली माहिती यांचा ताळमेळ बसल्यास प्रमाणपत्र त्वरित वैध ठरवले जाईल.

वेळेची बचत: प्रत्यक्ष विभागीय कार्यालयात जाण्याची आणि कागदपत्रे जमा करण्याची गरज उरणार नाही.पारदर्शकता: ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे डेटामध्ये फेरफार करणे अशक्य असल्याने बनावट प्रमाणपत्रांना आळा बसेल.त्रुटीमुक्त प्रक्रिया: मानवी हस्तक्षेप कमी झाल्यामुळे चुकांची शक्यता नगण्य असेल.

**खेळाडूंनी आणि क्रीडा संघटनांनी या डिजिटल प्रणालीला पूर्ण सहकार्य करावे, जेणेकरून पात्र खेळाडूंना आरक्षणाचे लाभ विनाविलंब मिळतील.**

**- रश्मी आंबेडकर,**
**जिल्हा क्रीडा अधिकारी**

**खरीप हंगाम २०२५-२६**

### धान खरेदीसाठी राज्य शासनाकडून ३४६ कोटींचा अग्रिम निधी वितरित

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/**राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आणि त्यांच्या कष्टाला योग्य मोल मिळवून देण्यासाठी राज्य शासन सरसावले आहे. खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत धान, मका आणि ज्वारीची खरेदी प्रक्रिया अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी शासनाने सुमारे ३४६ कोटी रुपयांचा अग्रिम निधी संबंधित खरेदी संस्थांना वितरित केला आहे.निधी



वितरणाचा तपशीलशेतकऱ्यांनी विकलेल्या पिकाचा मोबदला त्यांच्या बँक खात्यात वेळेत जमा व्हावा, यासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ आणि आदिवासी विकास महासंघाला मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे.

खरेदी संस्थाभात (कोटी रु.) मका (कोटी रु.) ज्वारी (कोटी रु.)म.रा. सहकारी पणन महासंघ १९४.७९१४.२४२.८३म. रा. आदिवासी विकास महासंघ १२९.४५४.६००.१६ (१६.३६ लाख) प्रमुख वैशिष्ट्ये आणि अंमलबजावणी हमी भावाचे संरक्षण: बाजारपेठेतील किमतींच्या MT -उतारापासून शेतकऱ्यांचे संरक्षण व्हावे, यासाठी किमान आधारभूत किमतीनुसार (MSP) ही खरेदी केली जात आहे.पारदर्शक प्रणाली: शेतकऱ्यांची नोंदणी, धान्याची गुणवत्ता तपासणी आणि वजनासाठी अद्ययावत प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.थेट लाभ हस्तांतरण (DBT): खरेदी केलेल्या धान्याचे पैसे थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहेत, ज्यामुळे मध्यस्थांची साखळी मोडीत निघेल.

पायाभूत सुविधांवर भर: वितरित केलेल्या निधीचा वापर केवळ देयकांसाठीच नाही, तर खरेदी केंद्रांवरील साठवणूक, वाहतूक आणि मनुष्यबळ व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी केला जाणार आहे.आदिवासी व दुर्गम भागावर विशेष लक्षया योजनेचा मोठा फायदा आदिवासी आणि दुर्गम भागातील शेतकऱ्यांना होणार आहे. आदिवासी विकास महामंडळाला स्वतंत्र निधी दिल्याने या भागातील खरेदी केंद्रे अधिक सक्रिय होतील आणि शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाचा मोबदला वेळेत मिळण्यास मदत होईल.शेतकऱ्यांना आवाहनअन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने आवाहन केले आहे की:ज्या शेतकऱ्यांनी अद्याप नोंदणी केली नाही, त्यांनी त्वरित आपली नोंदणी पूर्ण करावी.

केवळ अधिकृत खरेदी केंद्रांवरच आपला कृषी माल विक्रीसाठी न्यावा.शासनाने निश्चित केलेल्या गुणवत्ता निकषांनुसार (Quality Standards) माल विक्रीस आणल्यास प्रक्रिया अधिक वेगाने पार पडेल.राज्य शासनाच्या या निर्णयामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार असून, 'शेतकरी हित' हाच केंद्रबिंदू ठेवून ही मोहीम राबविली जात आहे.

# अंबडमध्ये बनावट नोटांच्या रॅकेटचा पर्दाफाश

## पोलिसांची धडाकेबाज कारवाई, १ लाख २२ हजारांच्या नोटांसह टोळी जेरबंद!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी** /एकीकडे सर्वसामान्य नागरिक कष्टाने पैसा कमावत असताना, दुसरीकडे बनावट नोटांच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेला खिळ घालणाऱ्या एका टोळीचा अंबड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. अंबड-पाचोड रोड परिसरात ५०० रुपयांच्या बनावट नोटांची विक्री करणाऱ्या टोळीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून, त्यांच्याकडून १ लाख २२ हजार रुपयांचे बनावट चलन जप्त करण्यात आले आहे. या कारवाईने जिल्ह्यात बनावट नोटा छापणाऱ्या आणि विकणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

गुप्त माहितीच्या आधारे रचला सापळा

६ फेब्रुवारी २०२६ रोजी अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष घोडके यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, अंबड शहरात काही लोक ५०० रुपयांच्या बनावट नोटा चलनात आणण्याच्या प्रयत्नात आहेत. माहिती मिळताच वेळेचा विलंब न लावता पोलिसांनी दोन पंचांना सोबत घेऊन अंबड-पाचोड रोडवर सापळा रचला.

**अशी झाली कारवाई**

**पहिली अटक:** पोलिसांनी संशयावरून विकास अनिल गडगूळ (वय २६, रा. शिवाजीनगर, अंबड) आणि एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले. त्यांच्या झडतीत पोलिसांना ५०० च्या बनावट नोटा सापडल्या.२.दुसरा दुवा: विकास गडगूळच्या चौकशीत त्याने या नोटा समरवीर सुनील खरात (वय २१, रा. आंबेडकर नगर, अंबड) याच्याकडून घेतल्याचे कबूल केले. पोलिसांनी तत्काळ समरवीरला अटक करून त्याच्याकडूनही बनावट चलन हस्तगत केले.

३.मुख्य सूत्रधार: पुढील तपासात या नोटांचे मूळ कनेक्शन आकाश नारायण शेळके (वय २८, रा. लोधी मोहल्ला, जालना) आणि आदित्या अमित गायकवाड (वय १९, रा. संभाजीनगर) यांच्यापर्यंत पोहोचले.

**काय काय झाले जप्त?**

पोलिसांनी केलेल्या या धडक कारवाईत एकूण २४४ बनावट नोटा (५०० रुपये दराच्या) जप्त केल्या आहेत, ज्यांची दर्शनी किंमत १ लाख २२ हजार रुपये आहे. आरोपींनी हे बनावट चलन बाजारात पसरवून लोकांची फसवणूक करण्याचा कट रचला होता.



**भारतीय न्याय संहिता कलम १७९, १८० नुसार गुन्हा दाखल**

पोलिसांनी या प्रकरणी सर्व आरोपींविरुद्ध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला असून, या टोळीचे धागेदोरे आणखी कुठे पसरले आहेत आणि मुख्य 'प्रिंटिंग मशीन' कुठे आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत.

**या पथकाने बजावली कामगिरी:**

ही कारवाई जालना पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष घोडके, उपनिरीक्षक बी.बी. नरोडे, यशवंत मुंढे, दीपक चव्हाण, अरुण मुंढे, संजय क्षीरसागर, केंद्रे, राऊत आणि चालक विनोद भानुसे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

### प्रियदर्शनी विद्यालयात 'डिजिटल पल्स व रीडिंग फेअर'चे थाटात उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर:** महानगरपालिका प्रियदर्शनी विद्यालय, मयूरबन कॉलनी येथे 'डी मार्ट फाउंडेशन'च्या सहकार्याने आयोजित 'डीएमएफ न्युअल शोकेस २०२५-२६' चे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी गुगल डॉक्स, स्क्रॅच आणि पेंट यांसारख्या तांत्रिक विषयांसह पपेट शो व वाचन कौशल्यांचे स्टॉल्स मांडले होते. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास पाहून विद्यार्थी कौशल्याने संगणक हाताळताना बघून मनस्वी आनंद झाला, असे गौरवोद्गार रणजीत पाटील यांनी काढले. याप्रसंगी डॉ. पारस मंडलेचा, उपायुक्त अंकुश पांढरे व शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. हे प्रदर्शन ६ फेब्रुवारी रोजी सर्वांसाठी खुले आहे.

# खुलताबादमध्ये लोकशाहीचा उत्सव! ५:३० वाजेपर्यंत ७७.८१%

## भरघोस मतदान; मतदारांचा उत्साह शिगेला

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद (प्रतिनिधी)** छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी आज खुलताबाद तालुक्यात मतदारांनी आपला हक्क बजावण्यासाठी मोठी गर्दी केली होती. सकाळी ७:३० वाजल्यापासून तालुक्यातील १०४ मतदान केंद्रांवर मतदानाची प्रक्रिया अत्यंत उत्साहात पार पडली. सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत तालुक्यात एकूण **७७.८१%** इतके दणदणीत मतदान झाल्याची अधिकृत माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुचिता शिंदे यांनी दिली आहे.

मतदानाची आकडेवारी: पुरुषांना मागे टाकत महिलांचाही मोठा सहभाग

### तालुक्यातील तीन प्रमुख मतदारसंघांमध्ये मतदारांनी खालीलप्रमाणे कौल दिला आहे:

| विभाग | एकूण मतदार | झालेले मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|
| बाजार सावंगी (२५) | २९,४६७ | २२,८७३ | ७७.६२% |
| गदाना (२६) | २७,४६५ | २२,२८९ | ८१.१५% |
| वेरूळ (२७) | २८,३७५ | २१,२१९ | ७४.७८% |

तालुक्यातील एकूण ८५,३०७ मतदारांपैकी ६६,३८१ मतदारांनी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदान केले. यामध्ये पुरुषांच्या मतदानाची टक्केवारी ७९.३३% राहिली, तर महिलांनीही ७६.१६% मतदान करून आपला मतदानाचा हक्क बजावला.

विभागावर मतदानाची सविस्तर स्थिती:

गदाना विभागात सर्वाधिक उत्साह

आजच्या मतदानात गदाना मतदारसंघाने बाजी मारली असून येथे सर्वाधिक ८१.१५% मतदान झाले आहे. त्याखालोखाल बाजार सावंगी विभागात ७७.६२% मतदान झाले. वेरूळ विभागातही ७४.७८% मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला असून शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली.



प्रशासकीय सज्जता

निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुचिता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील १०४ केंद्रांवर चोख बंदोबस्त आणि नियोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच मतदारांच्या रांगा लागल्या होत्या, विशेषतः तरुण आणि महिला मतदारांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. ५:३० वाजेपर्यंतची ही आकडेवारी असून अंतिम आकडेवारीनंतर यात अल्प वाढ होण्याची शक्यता आहे.

### विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक श्रेयांकाचे भगवेकरण थांबवा; 'आप'चा पुणे विद्यापीठाला इशारा!

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे/ प्रतिनिधी/** नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्यात प्रशासकीय कामात मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन शैक्षणिक श्रेयांक (ऊीशवळीं) देण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रस्तावित निर्णयावर आम आदमी पार्टीने कडाडून टीका केली आहे. हा निर्णय म्हणजे शैक्षणिक मूल्यांचा ऱ्हास आणि चुकीचा पायंडा पाडणारा असल्याची तोफ 'आप'चे महाराष्ट्र प्रवक्ते मुकुंद किर्दत यांनी डागली आहे.

**शैक्षणिक गुणवत्तेशी तडजोड नको**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार (छएझ), श्रेयांक हे कौशल्य विकास, आपत्ती व्यवस्थापन आणि सामाजिक जबाबदारीसाठी दिले जावेत. मात्र, कुंभमेळ्यासारख्या धार्मिक सोहळ्यातील सहभागाला शैक्षणिक श्रेयांकाशी जोडणे पूर्णपणे अनाठायी आहे. किर्दत यांनी स्पष्ट केले की, धार्मिक कामातील सहभाग हा ऐच्छिक असू शकतो, मात्र त्याला पदवीच्या गुणवत्तेशी जोडणे म्हणजे शिक्षणाचे गांभीर्य नष्ट करणे होय.

**'आप'चे प्रमुख आक्षेप:**मूल्य घसरण: एक श्रेयांक म्हणजे १५-१६ तासांचे शैक्षणिक सत्र असते. दोन श्रेयांक इतक्या सहजासहजी देणे विद्यापीठीय मानांकनाला धक्का लावणारे आहे.

राजकीय अजेंडा: शैक्षणिक संस्थांचा वापर विशिष्ट विचारधारेच्या प्रसारासाठी केला जात असल्याचा आरोप 'आप'ने केला आहे.

पर्याय काय?: श्रम गौरवासाठी सांस्कृतिक आणि खऱ्या सामाजिक कामांचे पर्याय उपलब्ध असताना केवळ कुंभमेळ्याचाच आग्रह का?विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा आणि कष्टाचा अपमान करू नये. हा प्रस्ताव तत्काळ मागे न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा मुकुंद किर्दत यांनी दिला आहे.

# दिल्लीच्या दरबारातील 'पॉवर' गेम आणि शरद पवारांची निवृत्ती?

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या वाऱ्याची दिशा वेगाने बदलत आहे. आगामी २ एप्रिल २०२६ रोजी राज्यसभेतील महाराष्ट्राच्या सात खासदारांचा कार्यकाळ संपत असून, या निवडणुका राज्याच्या राजकारणाला एक नवे वळण देणाऱ्या ठरणार आहेत. विशेषतः शरद पवार पुन्हा एकदा राज्यसभेवर जाणार की सक्रिय राजकारणातून संन्यास घेणार, या एका प्रश्नाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे.

२०२० मध्ये जेव्हा या सात जागांसाठी निवडणूक झाली होती, तेव्हा राज्यात महाविकास आघाडीचे वारे होते. त्यावेळी मविआकडे स्पष्ट बहुमत असल्याने त्यांनी चार जागा खिशात घातल्या होत्या. मात्र, गेल्या सहा वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणात झालेल्या मोठ्या भूकंपांनंतर आज चित्र पूर्णपणे उलटे झाले आहे. विधानसभा निवडणुकीनंतरचे पक्षीय बलाबल पाहता, यंदा 'महायुती'चे पारडे जड दिसत आहे.

**संख्याबळाचे गणित:** राज्यसभेच्या एका जागेसाठी साधारण ३७.५ मतांची आवश्यकता आहे. सध्याच्या विधानसभेतील आकड्यांनुसार,**महायुती:** भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गट यांच्या एकत्रित बळावर ६ जागा सहज निवडून येऊ शकतात.

**महाविकास आघाडी:** संख्याबळ घटल्यामुळे मविआला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागण्याची शक्यता आहे.

शरद पवारांच्या निर्णयाकडे देशाचे लक्ष

या संपूर्ण निवडणुकीतील सर्वात मोठा 'सस्पेन्स' म्हणजे शरद पवार यांची भूमिका. ८५ व्या वर्षात पदार्पण केलेले पवार आजही राजकारणात सक्रिय आहेत, मात्र त्यांनी यापूर्वीच लोकसभा लढवणार नसल्याचे स्पष्ट केले होते. आता २ एप्रिलला त्यांची राज्यसभेची मुदत संपत असताना, ते पुन्हा उमेदवारी अर्ज भरणार का? हा कळीचा मुद्दा आहे.जर शरद पवारांनी ही निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला, तर तो एका मोठ्या राजकीय कालखंडाचा अंत (एपव`ष रप ऐीर) मानला जाईल. मविआकडे सध्या केवळ एका जागेचे संख्याबळ आहे. अशा स्थितीत ती एक जागा शरद पवारांसाठी सोडली जाईल की काँग्रेस किंवा शिवसेना आपल्या उमेदवारासाठी आग्रही राहील, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

सुनेत्रा पवारांचा राजीनामा आणि रिक्त जागा

याच काळात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी आपल्या सोशल मीडिया बायोमध्ये 'माजी खासदार' असा उल्लेख केल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

विधानपरिषदेवर किंवा अन्य महत्त्वाच्या जबाबदारीसाठी त्यांनी हा राजीनामा दिल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे या रिक्त जागेचाही निकाल याच काळात लागण्याची शक्यता आहे.

या निवडणुकीत निवृत्त होणाऱ्या नावांमध्ये दिग्गज नेत्यांचा समावेश आहे.

भाजप/महायुती: डॉ. भागवत कराड, धैर्यशील पाटील, रामदास आठवले,राष्ट्रवादी (शरद पवार गट): शरद पवार, फौजिया खान,शिवसेना (ठाकरे गट): प्रियांका चतुर्वेदी.,काँग्रेस: रजनी पाटील,

२ एप्रिल २०२६ चा दिवस केवळ सात खासदारांच्या निवृत्तीचा दिवस नसेल, तर तो महाराष्ट्रातील भविष्यातील राजकीय संघर्षाची नांदी असेल. महायुती आपली ताकद वाढवून दिल्लीत महाराष्ट्राचा आवाज बुलंद करण्याचा प्रयत्न करेल, तर दुसरीकडे शरद पवारांचा एक निर्णय महाविकास आघाडीची पुढील रणनीती ठरवेल.

निवृत्ती की नवा डाव? या प्रश्नाचे उत्तर शरद पवारांच्या शैलीतच मिळेल, यात शंका नाही.

# महावितरण क्रीडा महोत्सवाचा छत्रपती संभाजीनगरमध्ये थाटात शुभारंभ; ५०० कर्मचाऱ्यांचा सहभाग

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील कर्मचारी 'कला व क्रीडा मंडळा'तर्फे आयोजित दोनदिवसीय वार्षिक क्रीडा महोत्सवाचा बुधवारी (७ फेब्रुवारी) मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विस्तीर्ण क्रीडांगणावर या स्पर्धेचे उद्घाटन पार पडले.



दिमाखदार उद्घाटन सोहळा

प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने यांच्या हस्ते स्पर्धेचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी महावितरणचे वरिष्ठ अधिकारी मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, प्रभारी महाव्यवस्थापक लक्ष्मीकांत राजेल्ली, अधीक्षक अभियंता बीना सावंत यांच्यासह कला व क्रीडा मंडळाचे सचिव विश्वास पाटील आणि विविध विभागांचे कार्यकारी अभियंता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**क्रिकेटच्या मैदानात रंगतदार लढती**

विद्यापीठाच्या मैदानावर एकूण १२ संघांमध्ये क्रिकेटचे सामने खेळवले जात आहेत. उद्घाटनाचा सामना परिमंडल विरुद्ध शहर-१ विभाग यांच्यात झाला, जो शेवटच्या षटकापर्यंत अटीतटीचा ठरला.**परिमंडल संघ:** ८ षटकांत ८० धावा केल्या (सागर कायस्थ २५ धावा, अमोल बाहेकर १० धावा). **शहर-१ संघ:**७५ धावांवर रोखले गेले (आशिष खानापुरे ४४ धावा, प्रसाद महातोले १० धावा).

विजयी संघ: आदित्य जीवने, कैलास राठोड आणि सागर कायस्थ यांच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर परिमंडलाने हा सामना जिंकला.इतर सामन्यांत सिल्लोड, ग्रामीण-१, जालना-१, शहर-२ आणि जालना मंडलाच्या संघांनी विजयी घोडदौड करत पुढील फेरीत प्रवेश केला. विशेष म्हणजे, ग्रामीण-१ कडून खेळताना पांडुरंग धांडे यांनी ३४ चेंडूत ९७ धावांची तुफानी खेळी केली.

**इनडोअर गेम्स: निकाल एका दृष्टिक्षेपात**

क्रिकेटसोबतच बॅडमिंटन, टेबल टेनिस, कॅरम आणि बुद्धिबळ या स्पर्धांमध्येही कर्मचाऱ्यांनी आपले कौशल्य दाखवले.

या महोत्सवात परिमंडलातील जवळपास ५०० कर्मचारी खेळाडू सहभागी झाले आहेत. कामाचा ताण हलका करण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांमधील क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महिला कर्मचाऱ्यांच्या प्रदर्शनीय सामन्याने प्रेक्षकांची विशेष दाद मिळवली.हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीचे सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

# सध्याच्या शिक्षणाची ढासळती गुणवत्ता अन् भविष्यातील शिक्षक व शिक्षणाची अवस्था

शिक्षण म्हणजेच गुणवत्ता वृद्धी. शैक्षणिक गुणवत्तेची व्याख्या आणि मोजमाप करणे, हे तसे अवघड व गुंतागुंतीचे काम. जगात शिक्षणाच्या इतिहासात शिक्षण गुणवत्तापूर्ण असायाल हवे असा विचार सातत्याने मांडण्यात येतो. शिक्षणाच्या इतिहासाची पाने चाळली तर शिक्षण गुणवत्तापूर्ण होते असे फारसे दिसत नाही. खरं तर गुणवत्ता म्हणजे नेमके काय? हे व्याख्येत बांधण्याचा प्रयत्न आजवर अनेकांनी केला आहे. मात्र, त्या व्याख्येत अपेक्षांची भिन्नता दिसून येते. शिक्षणाच्या प्रक्रियेत आपण गुणवत्तेचा जो विचार करतो आहोत आणि त्यात गुणवत्तेची जी कल्पना आहे ती व्यक्ती सापेक्ष संकल्पना आहे. समाज जसा जसा गतीमान होत जातो त्याप्रमाणे शिक्षणाकडून देखील अपेक्षा सतत बदलत जात आहेत. जगभरात होणारी संशोधने, औद्योगिक विकास, समाजात रूजणारे विज्ञान, बदलणारी राजकीय विचारधारा यानुसारही शिक्षणाकडून अपेक्षा बदलत जातात

वर्तमानातील अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न शिक्षणाकडून होण्याची गरज असते. मात्र, त्या अपेक्षा शिक्षणातून साध्य होतील असे घडत नाही. वर्तमानातील अपेक्षा शिक्षणाकडून पूर्ण झाल्या नाही तर शिक्षण गुणवत्तापूर्ण नाही असे मानले जाते. त्यामुळे शिक्षण गुणवत्तापूर्ण करण्यासाठीचे प्रयत्न व्यवस्थेत सातत्याने होत असतात. प्रयत्न जसे होत जातात त्याप्रमाणे अपेक्षा पुन्हा उंचावत जातात हेही वास्तव आहे. शिक्षणातून अपेक्षा असतात आणि त्या पूर्ण करण्यासाठी काळ लागत असतो. त्यामुळे वर्तमानातील अपेक्ष पूर्ण करण्यासाठी भविष्यात वाट चालावी लागते. वाट जशी चालत जातो त्याप्रमाणे अपेक्षा पुन्हा पुन्हा उंचावत जातात. त्यामुळे शिक्षणात अपेक्षां पूर्णत्वाला जाण्याची शक्यता कधीच नसते.

आज बऱ्याच शाळा ओसाड पडत आहे. कारण तिथे शिक्षकांचा तुटवडा पडत आहे. कुठे ७ वर्गासाठी १ किंवा २ तर कुठे ५ वर्गासाठी १ च शिक्षक आहे. त्यामुळे शिक्षणाची अपेक्षापूर्ती होत नाही. यामुळे शिक्षणाची गुणवत्ता ढासळत चालली आहे. केवळ हेच कारण नाही, तर बरेच शिक्षक आपल्या शिक्षकीपेशाला काळीमा फासणारे आहेत. ब-याच शिक्षकांच्या हालचालीवरून, व्यवहारावरून एकंदरीत त्यांच्या वर्तवणूकीवरून ते विद्यार्थ्यांचं काय भविष्य घडवतील हा प्रश्न सतत मनाला सतावतो. यातीलच एक कारण पुढे करून शिक्षक पण शिकविण्यास पात्र असावे म्हणून राज्य शासनाने शिक्षक पात्रता परीक्षा घेणे सुरु केले आहे. विद्यार्थ्यांना घडविणारे शिक्षकवृंद पण 'तावून सुलाखून' निघणार असतील तर उत्तम. हा त्यामागचा हेतू शासनाने ठेवला.

उद्याची पिढी घडवणा-या राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षक पात्रतेसाठी महत्त्वाची असलेली महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) च्या २०२५ मध्ये झालेल्या अंतिम परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. मात्र, या निकालाने राज्यातील अनेकांच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले आहे. हा निकाल शिक्षण क्षेत्रास चांगलाच धक्का देणारा ठरला असून राज्यातील शिक्षक गुणवत्तेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या परीक्षेत केवळ ११.२८ टक्के शिक्षक उमेदवार उत्तीर्ण झाले. ४.७५ लाख शिक्षकांपैकी ३ लाख ९६ हजार शिक्षक अनुत्तीर्ण झाले ही बाब धक्कादायक आहे. केवळ धक्कादायकच नसून भविष्यातील शिक्षक व शिक्षण यांच्या दारुण परिस्थिवर प्रकाश टाकणारी आहे. सर्वाधिक कन्नड माध्यमाचे १५ टक्के तर मराठीचे १२.२८ टक्के, हिंदीचे १२.१९ टक्के तर तेलुगू माध्यमाचे याच सरासरीच्या आसपास उमेदवार उत्तीर्ण झाले. यात उर्दू, इंग्रजी आणि विशेषत: गुजराती माध्यमाचा निकाल सर्वात कमी ३.४४ टक्के लागला.

क्षेत्र कोणतेही असो मग ते आयटीचे असो की वैद्यकीय. झपाट्याने होणा-या बदलांना सामोरे जाताना स्वत:ला कालसुसंगत राखणे हे आवाहन झाले आहे. एकदा डीएड झालो आणि शिक्षक म्हणून चिकटलो की मोकळे ही ब-याच शिक्षकांची मानसिकता...आता वर्षानुवर्ष मी कुठल्याही परीक्षेला कशाला सामोरे जायचे? या भावनेतून टीईटी परीक्षेला काही शिक्षक संघटनांचा विरोध राहिला. अन्य क्षेत्रात स्वत:ला अपडेट ठेवण्याकरिता धडपड सुरु असताना शिक्षकांनी अशी भूमिका घेणे हे योग्य नव्हेच. एआयमुळे वेगवेगळ्या क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. भविष्यात शिक्षण क्षेत्रही त्यापासून वेगळे नसेल. त्यामुळे आपल्या बुद्धीला तावूनसुलाखून पाहण्यात काहीच गैर नाही.

मात्र, ज्यांनी शिकविण्याकरिता अजून खडू हातात धरलाही नाही, अशा शिक्षकांची या परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्याची मोठी संख्या आहे. आता जे उत्तीर्ण झाले ते सध्या शिक्षक असून ही परीक्षा दिल्याखेरीज आपली नोकरी कायम होणार नाही, अशी टांगती तलवार मानगुटीवर कायम असल्याने ज्यांनी परीक्षा दिली तेच यात उत्तीर्ण झाल्याने निकाल ११ टक्क्यांच्या आसपास लागला. यावरून भविष्यातील शिक्षक व शिक्षण यांची अवस्था कशी भीतीदायक आहे, याचाच साक्षात्कार होतो. शिक्षक होण्याकरिता धडपडणा-यांना अपयश येण्याचे मुख्य कारण हे सध्याच्या कंत्राटी शिक्षणात आहे. अनेक युवक-युवती वेळप्रसंगी अन्य छोटी-मोठी कामे करणे पसंत करतात. मात्र, शिक्षक होण्याला तिलांजली वाहतात. अत्यल्प वेतन देऊन अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षकांची पिळवणूक होते. एका रकमेवर स्वाक्षरी घ्यायची आणि अत्यल्प रक्कम हातावर टेकवायची, असे प्रकार अनेक शैक्षणिक संस्थामध्ये सर्रास होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे अन्य कुठल्याच क्षेत्रात पाय रोवता आला नाही तोच शेवटचा पर्याय म्हणून या क्षेत्राकडे वळतो, असे म्हटले तर ते अयोग्य ठरणार नाही. याच भीतीपोटी असले प्रकार सहन करण्यावाचून पर्याय नसतो.ज्यांना निवृत्तीला केवळ ६ महिने बाकी आहेत. अशा शिक्षकांनाही ही परीक्षा सक्तीची केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे ही परीक्षा अनिवार्य केली गेली. एकीकडे अशैक्षणिक कामाच्या बोजाने शिक्षक त्रस्त आहेत. शालेय पोषण आहारातील तांदुळाचा हिशेब ठेवण्यापासून तंबाखुमुक्त अभियानाची माहिती सरकारला भरून देण्यापर्यंत जवळपास शंभरेक कामे शिक्षकांना लावली आहेत.

सरकारचे अशैक्षणिक कामे शिक्षकांवर लादण्याचे धोरण असमर्थनीय आहे. यामुळे शिक्षकांचे मूळ कामाकडे दुर्लक्ष होत आहे. या कामांच्या बोजाने शिक्षक अक्षरश: वाकले आहेत. शिवाय शिक्षकांकरिता वेगवेगळे प्रशिक्षण आयोजित केले जाते. त्यामुळेही या परीक्षेला विरोध होत आहे. टीईटी परीक्षेची काठिण्य पातळी जास्त आहे. दिलेल्या ४ पर्यायातून १ पर्याय निवडायचा असतो. शिवाय निगेटिव्ह मार्किंग (नकारात्मक गुण पद्धत) आहे. त्यामुळे अनेकदा शिक्षकांचा गोंधळ उडतो. परिणामी त्यांच्या पदरात भोपळा पडतो. जसे टीईटी परीक्षेला विरोध करणा-यांचे समर्थन करता येत नाही तसेच टीईटीची सरसकट सक्ती ही देखील योग्य म्हणता येत नाही. विद्यार्थ्यांकडून गुणवत्तेची व पैकीच्या पैकी गुणांची अपेक्षा करणा-या शिक्षकांनी टीईटी परीक्षेत अधिक चमकदार कामगिरी करून आपली गुणवत्ता सिद्ध करावी ही अपेक्षा बाळगणे अचूक आहे.

**-शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**

## बारामती विधानसभा पोटनिवडणूक: मतदारयादी अद्ययावत करण्यासाठी विशेष मोहीम जाहीर; १० मार्चला अंतिम प्रसिद्धी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/**पुणे जिल्ह्यातील २०१-बारामती विधानसभा मतदारसंघातील रिक्त जागा भरण्यासाठी लवकरच पोटनिवडणूक होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर, भारत निवडणूक आयोगाने मतदारयादी अधिक अचूक आणि पारदर्शक करण्यासाठी 'विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम' जाहीर केला आहे.लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधील कलम २१ अन्वये हा कार्यक्रम राबविण्यात येणार असून, १ जानेवारी २०२६ हा अर्हता दिनांक (Eligibility Date) निश्चित करण्यात आला आहे.पुनरीक्षण कार्यक्रमाचे महत्त्वाचे टप्पे (वेळापत्रक):टप्पादिनांकप्रारूप मतदारयादी प्रसिद्धी९ फेब्रुवारी २०२६ (सोमवार)दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी ९ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२६ दावे व हरकतींची छाननी व निकाल ६ मार्च २०२६ पर्यंत अंतिम मतदारयादीची प्रसिद्धी१० मार्च २०२६ (मंगळवार)प्रक्रियेची ठळक वैशिष्ट्ये:पारदर्शकतेवर भर: मतदारयादी पूर्णपणे अद्ययावत, अचूक आणि त्रुटीमुक्त राहावी यासाठी निवडणूक आयोग विशेष खबरदारी घेत आहे.

राजकीय पक्षांचा सहभाग: प्रक्रियेत सुसूत्रता राखण्यासाठी पुणे जिल्हाधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि बारामती मतदार नोंदणी अधिकारी यांच्या स्तरावर मान्यताप्राप्त राजकीय पक्षांसोबत विशेष बैठकांचे आयोजन केले जाणार आहे.मतदान केंद्र निश्चिती: या बैठकीत केवळ मतदारयादीच नव्हे, तर मतदान केंद्रांच्या रचनेबाबतही राजकीय पक्षांना सविस्तर माहिती दिली जाईल आणि त्यांच्या सूचना विचारात घेतल्या जातील.

नागरिकांसाठी आवाहन:ज्या नागरिकांची नावे मतदारयादीत नाहीत किंवा ज्यांना आपल्या माहितीमध्ये दुरुस्ती करायची आहे, त्यांनी ९ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी या कालावधीत आपले दावे आणि हरकती नोंदवणे आवश्यक आहे. १० मार्च रोजी प्रसिद्ध होणारी यादीच आगामी पोटनिवडणुकीसाठी अंतिम मानली जाईल.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासकीय यंत्रणेला सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.

# श्री संत गजानन महाराज : अद्भुत दैवी शक्ती

श्री संत गजानन महाराजांची महिमा अपरंपार आहे, ही बाब सर्वश्रुत आहे. म्हणूनच त्यांना ब्रह्मांडनायक, राजाधिराज, योगीराज असे गौरवाने संबोधले जाते. त्यांच्या महिमेचा प्रभाव संपूर्ण ब्रह्मांडात पसरलेला आहे, असे भक्त मानतात.आज जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते-भारतामध्ये महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून ओळखले जाते. कारण महाराष्ट्राच्या भूमीत अनेक थोर संत, महात्मे जन्माला आले. त्यांपैकीच एक महान संत म्हणजे श्री संत गजानन महाराज.

संत गजानन महाराजांचे असंख्य चमत्कार भक्तांनी अनुभवले आहेत. संपूर्ण भारतात शांततेचे प्रतीक म्हणून शेगावचे श्री गजानन महाराजांचे मंदिर व त्याचा परिसर प्रसिद्ध आहे. माघ वद्य सप्तमी, शके १८०० (दि. २३ फेब्रुवारी १८७८) रोजी बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे संत गजानन महाराज तारुण्यावस्थेत प्रगट झाले.

आज श्री संत गजानन महाराजांमुळे शेगाव हे गाव संपूर्ण भारतात प्रसिद्ध झाले आहे. सुरुवातीच्या काळात महाराज साधू देविदास पातूरकरांच्या मठाबाहेर टाकलेल्या उष्ट्या पत्रावळीतील अन्नकण वेचून खात असत व गुरांसाठी ठेवलेले पाणी पिऊन निघून जात. पुढे बार्शी येथील ब्रह्मनिष्ठ श्री गोविंद महाराज टाकळीकर यांचे शेगाव येथील महादेव मंदिरात कीर्तन झाले. त्यावेळी बेफाम घोड्याच्या चौपायांमध्ये श्री गजानन महाराज ब्रह्मानंदी निमग्न होऊन निजलेले दिसले; मात्र तो तुफानी घोडा अचानक शांत झाला. हा अद्भुत प्रसंग पाहून गोविंद महाराजांनी श्री गजानन महाराजांची योग्यता ओळखली व भक्तिभावाने त्यांची पूजा केली. तेव्हापासूनच महाराजांची कीर्ती शेगाव परिसरात पसरू लागली.

यानंतर महाराजांचे अनेक चमत्कार लोकांनी अनुभवले. बंकटलाल अग्रवाल यांना गजानन महाराज प्रथम दर्शनास आले तेव्हा त्यांच्या मुखातून सतत गण गण गणात बोते हा जप ऐकू येत होता. हाच जप पुढे सर्व भक्तांच्या हृदयात स्थान मिळवून गेला आणि श्री गजानन महाराजांची महिमा सर्वत्र पसरली.महाराजांच्या तीर्थस्पर्शाने जानराव देशमुख हे मरणोन्मुख अवस्थेतून बरे झाले. अनेक भक्तांना त्यांनी साक्षात पांडुरंगाचे दर्शन घडविले. श्री गजानन महाराज हे दिगंबर वृत्तीचे, सिद्धकोटीला पोहोचलेले महान संत होते. वाटेल ते खाणे, कुठेही निवास करणे व मुक्त संचार करणे हीच त्यांची जीवनशैली होती. एकदा एका स्त्रीने मिरचीचा वाटलेला मोठा गोळा दिला; तो महाराजांनी पेढा-बर्फीप्रमाणे आनंदाने खाल्ला आणि लोटाभर पाणी पिऊन तृप्त झाले.



लोक भक्तिभावाने महाराजांना वस्त्रे, अलंकार, पैसे व खाद्यपदार्थ अर्पण करत; परंतु महाराज ते सर्व तिथेच ठेवून निघून जात. त्यांच्या सहवासाने भक्तांना मनःशांती मिळे आणि ईश्वरलीलेमुळे सर्वजण प्रसन्न राहत.आजही महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांत श्री संत गजानन महाराजांची पूजा-अर्चना मोठ्या भक्तिभावाने केली जाते. दरवर्षी माघ कृष्ण पक्ष सप्तमीला महाराजांचा प्रगट दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी दिनांक ८ फेब्रुवारी रोजी श्री गजानन महाराजांचा १४८ वा प्रगट दिन संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होत आहे.

प्रत्येक वर्षी विठ्ठल दर्शनासाठी शेगावहून पालखी निघते आणि हा पालखी सोहळा भक्तांसाठी एक अलौकिक अनुभव ठरतो. दररोज हजारो भाविक शेगाव येथे दर्शनासाठी येतात व येथे महाप्रसादाचे भव्य आयोजन केले जाते.

श्री संत गजानन महाराज हे केवळ संत नव्हे, तर निसर्गप्रेमीही होते. म्हणूनच त्यांच्या प्रगट दिनानिमित्त वृक्षारोपण होणे अत्यंत गरजेचे आहे. दिवसेंदिवस जंगलसंपदा नष्ट होत असून निसर्गाचे संतुलन ढासळत आहे. याचे परिणाम सुनामी, भूकंप, अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा यांसारख्या आपत्तींमधून दिसून येतात.

प्रगट दिनाच्या निमित्ताने फुलांऐवजी झाडे लावण्याचा संकल्प सर्वांनी करावा. प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात व फळात आपल्याला श्री गजानन महाराजांचे दर्शन होईल. वृक्षलागवडीमुळे संपूर्ण जीवसृष्टीला प्राणवायू, सावली व जीवन मिळेल-यातच आपल्या सेवाभावाचे खरे सार्थक आहे. म्हणून सर्व भक्तांना नम्र विनंती आहे की श्री संत गजानन महाराजांच्या १४८ व्या प्रगट दिनानिमित्त जास्तीत जास्त वृक्षारोपण करून हा दिवस सामाजिक आणि पर्यावरणीय दृष्टीने अर्थपूर्ण करावा.

श्री संत गजानन महाराजांना कोटी कोटी प्रणाम! जय गजानन महाराज!

**-रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**

# अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली बदनामी खपवून घेणार नाही: दिल्ली उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

सोशल मीडियाच्या नावाखाली कोणाचीही बदनामी करणे हा अधिकार असू शकत नाही, असे स्पष्ट करत दिल्ली उच्च न्यायालयाने डिजिटल युगातील नैतिकतेवर शिक्कामोर्तब केले आहे. 'फिजिक्सवाला लिमिटेड विरुद्ध निखिल कुमार सिंह' या गाजलेल्या खटल्यात न्यायमूर्ती ज्योती सिंह यांनी हा निकाल दिला.

१. प्रकरणाची पार्श्वभूमी

प्रसिद्ध ऑनलाइन शिक्षण मंच 'फिजिक्सवाला' आणि त्यांचे माजी कर्मचारी निखिल कुमार सिंह यांच्यात हा कायदेशीर वाद निर्माण झाला होता. निखिल सिंह यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर 'फिजिक्सवाला' संस्थेच्या विरोधात अत्यंत अपमानजनक आणि बदनामीकारक व्हिडिओ व पोस्ट प्रसारित केल्या होत्या. यामुळे संस्थेच्या प्रतिमेला तडा जात असल्याचा दावा करत 'फिजिक्सवाला'ने न्यायालयात धाव घेतली होती.



२. न्यायालयाचे मुख्य निरीक्षण

न्यायालयाने या प्रकरणात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा चुकीचा अर्थ लावणाऱ्यांना कडक शब्दांत फटकारले.प्रतिष्ठेचा अधिकार: न्यायालयाने स्पष्ट केले की, भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत 'जगण्याचा अधिकार' यामध्ये 'सन्मानाने जगण्याचा अधिकार' देखील समाविष्ट आहे. संतुलन आवश्यक: अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा मौल्यवान अधिकार असला, तरी तो अमर्याद नाही. दुसऱ्याची प्रतिष्ठा मलिन करण्याचा परवाना कोणालाही दिलेला नाही.

अंतरिम मनाई हुकूम: प्रतिवादीने दिलेला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा युक्तिवाद फेटाळून लावत, न्यायालयाने संबंधित सर्व आक्षेपार्ह मजकूर त्वरित हटवण्याचे किंवा त्यावर बंदी घालण्याचे आदेश दिले.

३. तज्ज्ञांचे मत: जबाबदार सोशल मीडिया वापराचा संदेश

या निकालाचे कायदेशीर वर्तुळात स्वागत होत आहे. नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ड. महेश धन्नावट यांनी या निर्णयाचे महत्त्व विशद करताना म्हटले.

डिजिटल युगात एखाद्या व्यक्तीची किंवा संस्थेची अनेक वर्षांची मेहनत आणि प्रतिष्ठा एका पोस्टमुळे धोक्यात येऊ शकते. हा निकाल अशा ऑनलाइन गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी अत्यंत गरजेचा होता. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे जबाबदारीसह येते, हेच न्यायालयाने यातून पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्ससाठी इशारा: कोणत्याही पुराव्याशिवाय किंवा केवळ द्वेषातून केलेली टीका कायदेशीर कारवाईला पात्र ठरू शकते.संस्थात्मक संरक्षण: व्यावसायिक संस्थांना त्यांच्या ब्रँडची प्रतिमा जपण्यासाठी आता अधिक भक्कम कायदेशीर आधार मिळाला आहे. जबाबदारीचे भान: हा निकाल केवळ कायदेशीर नसून सामाजिकदृष्ट्या देखील महत्त्वाचा आहे, जो नागरिकांना सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने करण्याचे आवाहन करतो.

# पिशोर व चिंचोली परिसरात मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; मतदान प्रक्रिया शांततेत पडली पार

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी झालेल्या मतदान प्रक्रियेत पिशोर, चिंचोलीसह ग्रामीण भागातील मतदारांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. लोकशाहीवरील आपला विश्वास अधोरेखित करत मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याने सर्वच केंद्रांवर समाधानकारक ते उच्च टक्केवारी पाहायला मिळाली. ग्रामीण भागात निवडणुकीबाबत मोठी जनजागृती झाल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

गावनिहाय मतदानाची आकडेवारी खालीलप्रमाणे:

पिशोर व आसपासच्या परिसरात मतदारांचा उत्साह दिसून आला. पिशोर येथे एकूण १५,०८३ मतदारांपैकी ११,४०३ जणांनी मतदान केले. नादरपूर येथे १,६७१ पैकी १,२१३, तर खातखेडा येथे १,२०३ पैकी ९७५ मतदारांनी आपला हक्क बजावला. सारोळा गावातही मतदारांनी विक्रमी प्रतिसाद दिला असून तेथे २,००४ पैकी तब्बल १,५२७ जणांनी मतदान केले.

### इतर गावांतील चित्र:

नाचनवेल: २,६४२ पैकी १,८२१ मतदान.
आडगाव पि.: १,८५९ पैकी १,१८९ मतदान.
डोगरगाव: ८९३ पैकी ६३० मतदान.
टाकळी शहू: १,०६६ पैकी ७६४ मतदान.
मोहरा: १,५५६ पैकी १,११५ मतदान.
आमदाबाद: ८६० पैकी ७०० मतदान.
जवखेडा बु.: १,३८६ पैकी ८४५ मतदान.
जवखेडा खुर्द: ७३५ पैकी ५७६ मतदान.
दिगाव: १,६०६ पैकी १,२२० मतदान.
खेडी: ७१७ पैकी ६११ मतदान.
मोहाडी: ५६५ पैकी ३९६ मतदान.



लोकशाहीसाठी सकारात्मक चित्र: पंचायत समिती गणातील बहुतांश गावांमध्ये सरासरी ६० ते ७५ टक्क्यांच्या दरम्यान मतदान झाले आहे. मतदानाची ही वाढलेली टक्केवारी लोकशाहीसाठी अत्यंत सकारात्मक मानली जात आहे. विशेष म्हणजे संपूर्ण परिसरात कोणतीही अनुचित घटना न घडता मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली.

प्रशासनाने केलेले नियोजन आणि मतदारांचा उत्साह यामुळे ही निवडणूक प्रक्रिया यशस्वी ठरली असून, आता सर्वांच्या नजरा निकालाकडे लागल्या आहेत. उमेदवारांचे भवितव्य आता मतपेटीत बंद झाले असून कोण बाजी मारणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

# रमाईंचे 'सामाजिक मातृत्व' हा उपेक्षितांच्या संघर्षाचा कणा: डॉ. मंजूश्री लांडगे

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/माता रमाईंचे सामाजिक मातृत्व हे केवळ एका कुटुंबापुरते मर्यादित नसून ते अत्यंत व्यापक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या खांद्याला खांदा लावून सामाजिक संघर्षात त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत डॉ. मंजूश्री लांडगे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील रमाबाई आंबेडकर अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहात शनिवारी (दि. ७ फेब्रुवारी) रमाई जयंती निमित्त विशेष व्याख्यान आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.

डॉ. लांडगे पुढे म्हणाल्या की, रमाई अत्यंत कणखर स्वभावाच्या होत्या. बाबासाहेबांच्या आंदोलनात त्यांचा सहभाग महत्त्वपूर्ण होता. त्यांचा संघर्ष केवळ घराच्या उंबरठ्यापर्यंत नव्हता, तर तो समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणारा होता.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवताना वसतिगृहाच्या अधीक्षिका प्रा. अश्विनी मोरे यांनी नमूद केले की, रमाईंचे कार्य कुटुंब आणि राज्याच्या सीमा ओलांडून संपूर्ण देशाला दिशा देणारे होते. म्हणूनच भारतातील तमाम उपेक्षित वर्ग त्यांना आपली 'राष्ट्रमाता' मानतो. या प्रसंगी प्रा. गौरी कल्लावार आणि प्रा. प्रवीणा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

रमाईंच्या जयंतीनिमित्त वसतिगृहातील मुलींच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेते खालीलप्रमाणे आहेत:

१. भित्तीपत्रक स्पर्धा प्रथम: निकिता फफाळ,द्वितीय: आकांक्षा मल्हारे,तृतीय: संस्कृती खंदारे,२. घोषवाक्य स्पर्धा ,प्रथम: साक्षी तोष्णीवाल,द्वितीय: अपेक्षा जावरे,तृतीय: नम्रता साळवे,३. संगीतखुर्ची स्पर्धा,प्रथम: संस्कृती खंदारे,द्वितीय: दीक्षा शिनगारे,तृतीय: श्रूती खरात या कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन संस्कृती खंडारे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अपेक्षा जावरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरला वाकळे, प्रभा भिंगारे, मीना शेजवळ, वर्षा अहिरे आणि मनीषा गायकवाड या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मूर्ती प्रतिष्ठासह कलश रोपणाची झाली,रामनामाचे गजरात सांगता

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/उदय कुलकर्णी**/ तालुक्यातील जोडबोरसरखुर्द ग्रामी सुरु असलेल्या दक्षिणमुखी हनुमान मूर्ती सह इतर देवदेवता मूर्तिच्या प्राणप्रतिष्ठा व मंदिर कलशरोपण सोहळ्याची दि.६ रोजी मोठ्या भक्तिमयव रामनामाचे गजरात सांगता झाली.



दि.६ रोजी पासून जोडबोरसर गावी श्री.विठ्ठल रुख्मिणी संस्थान अंमळनेरचे सर्वेसर्वा तसेच पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान गुरुवर्य असलेले.ह.भ.प. प्रसाद महाराज अंमळनेरकर यांचे आशीर्वादाने व प्रेरनेने दि.४ ते ६ एप्रिल पर्यंत सुरु असलेल्या मूर्ती प्रणप्रतिष्ठा व कलशरोपण यज्ञयाग उत्सवाची सांगता त्यांचे हस्ते विधिवत पूजा करून करण्यात आली.

यावेळी पैठण निवासी व नाथ महाराजांचे वंशज ह.भ.प.श्री.पुष्कर महाराज गोसावी यांचे अमृवाणी कीर्तनाने या भव्य- दिव्य मूर्ती प्रतिस्थापना व कलशरोपण उत्सवाची सांगता भक्तिमय वातावरणात करण्यातआली.यावेळी देभेगाव येथील मठाधीपती गुरुवर्य ह.भ.प. गुरुवर्य ज्ञानदास महाराज,श्रीकृष्ण आश्रम वैसपूरचे सर्वेसर्वा ह.भ.प.स्वामी रामेश्वराणंद सरस्वती महाराज,तसेच पंढरपूर,आळंदी,पैठण निवासी ह.भ.प. महाराज पंचक्रोशीतील असंख्य भावीक जोडबोरसर खु.बु. गावातील भक्तगणमोठ्या संख्येने या उत्सवात सहभागी झाले होते.शेवटी महाप्रसादाने उत्सवाची सांगता करण्यात आली.

# भारत आणि सेशेल्सचे संबंध मैत्रीपूर्ण व धोरणात्मक; विकासाच्या नव्या संधींना मिळणार चालना

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/भारत आणि सेशेल्स हे केवळ मित्र राष्ट्र नसून हिंद महासागरातील महत्त्वाचे धोरणात्मक भागीदार आहेत. दोन्ही देशांमधील व्यावसायिक संवादामुळे विकासाची नवीन दालने उघडली जातील, असा विश्वास सेशेल्स प्रजासत्ताकचे राष्ट्रपती डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांनी व्यक्त केला.मुंबईतील हॉटेल ताज येथे भारतीय उद्योग महासंघ (CII) आणि परराष्ट्र मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारत-सेशेल्स व्यावसायिक परिषद' बैठकीत ते बोलत होते. राष्ट्रपती डॉ. हर्मिनी आणि त्यांच्या पत्नी श्रीमती व्हेरॉनिक हर्मिनी सध्या भारताच्या अधिकृत दौऱ्यावर असून, या परिषदेत दोन्ही देशांमधील आर्थिक आणि सामाजिक संबंध अधिक दृढ करण्यावर भर देण्यात आला.

या महत्त्वपूर्ण बैठकीला सेशेल्सचे अर्थमंत्री पिअर लापोर्ते, परराष्ट्र मंत्री बॅरी फॉली, भारताचे केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल, मंत्रालयाचे सचिव विजय कुमार, मुंबई बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष एम. अंगामुथू, आणि जेएनपीए (गछ्झ-) चे अध्यक्ष गौरव दयाल यांच्यासह उद्योग क्षेत्रातील दिग्गज उपस्थित होते.

राष्ट्रपती डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांचे संबोधन: 'भारताचा अनुभव आमच्यासाठी मार्गदर्शक'

राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात भारताच्या प्रगतीचे कौतुक करताना खालील मुद्द्यांवर प्रकाश टाकला.भारतीय समुदायाचे योगदान: सेशेल्समध्ये वास्तव्यास असलेल्या हजारो भारतीय वंशाच्या नागरिकांनी तिथल्या सामाजिक आणि आर्थिक जडणघडणीत मोठे योगदान दिले आहे. सहकार्याची ५० वर्षे: गेल्या पाच दशकांपासून दोन्ही देश विविध क्षेत्रांत एकत्र काम करत आहेत.**आर्थिक आदर्श:** जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था असलेल्या भारताकडून शाश्वत विकासाचे धडे घेण्यास सेशेल्स उत्सुक आहे. सागरी क्षेत्र, आरोग्य, शिक्षण आणि ऊर्जा यांत नाविन्यपूर्ण संकल्पना राबवण्यावर त्यांनी भर दिला.




### केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांचे प्रतिपादन

केंद्रीय मंत्री सोनोवाल यांनी सांगितले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत आणि सेशेल्समधील भागीदारीला नवी गती मिळाली आहे. केवळ व्यापारच नव्हे, तर सागरी सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन आणि आरोग्यसेवा यांत दोन्ही देश एकमेकांना पूरक ठरत आहेत. हिंद महासागरातील व्यापार आणि संस्कृतीची ही देवाणघेवाण भविष्यात अधिक व्यापक होईल.

### गुंतवणुकीच्या नव्या संधी: सेशेल्स व्यवसायासाठी सज्ज

सेशेल्सचे अर्थमंत्री पिअर लापोर्ते यांनी भारतीय उद्योजकांना सेशेल्समध्ये गुंतवणुकीचे आवाहन केले. त्यांनी प्रामुख्याने खालील क्षेत्रांचा उल्लेख केला. डिजिटल पायाभूत सुविधा: भारताच्या 'डिजिटल इंडिया' मोहिमेचा फायदा सेशेल्सला करून घेण्याची इच्छा.ब्लू इकॉनॉमी व मत्स्यव्यवसाय: सागरी साधनसंपत्तीचा शाश्वत वापर.हरित ऊर्जा: सौर तंत्रज्ञान आणि ई-बससाठी सहकार्य. पर्यटन, चित्रपट उद्योग, फिनटेक, रिअल इस्टेट आणि दूरसंचार.निष्कर्ष: ही परिषद भारत आणि सेशेल्स यांच्यातील द्विपक्षीय व्यापार वाढवण्यासाठी एक मैलाचा दगड ठरणार आहे. सेशेल्सने दिलेले 'गुंतवणूक-अनुकूल' वातावरणाचे आश्वासन भारतीय कंपन्यांसाठी आफ्रिकी बाजारपेठेत प्रवेश करण्याचे एक महत्त्वाचे द्वार ठरू शकते.

# प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांचे प्रतिपादन; 'मूकनायक' राज्यस्तरीय पुरस्काराचे थाटात वितरण

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/सामाजिक आणि राजकीय चळवळीला गती देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायकपासून ते प्रबुद्ध भारतपर्यंत विविध वृत्तपत्रे सुरू केली. एका बाजूला अशिक्षित आणि अस्पृश्य जनतेमध्ये जागृती घडवणे, तर दुसऱ्या बाजूला वंचितांचे प्रश्न राजकीय पटलावर ठळकपणे मांडणे-या दुहेरी भूमिकेतून त्यांनी वृत्तपत्रातून प्रभावी लेखन केले. त्यांच्या लेखनातील वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रभावी भाषाशैली हा एक महत्त्वाचा पैलू असून बाबासाहेबांची सर्व वृत्तपत्रे मानवतेची प्रेरणा देणारी आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ आंबेडकरी साहित्यिक, समीक्षक व विचारवंत प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी केले.

शाक्यमुनि प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने दिला जाणारा 'मूकनायक' राज्यस्तरीय पुरस्कार (२०२६) शुक्रवारी ज्येष्ठ पत्रकार मधु कांबळे (कोपरी, जि. ठाणे) यांना प्रदान करण्यात आला. खोकडपुरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या सभागृहात 'मूकनायक दिना'निमित्त आयोजित या पुरस्कार वितरण सोहळ्यात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाक्यमुनि प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. शरद वंजारे होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस. एस. भगत, कर्करोग महाविद्यालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड, नालंदा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे आणि समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त रविंद्र शिंदे उपस्थित होते. प्रा. डॉ. कांबळे यांनी बाबासाहेबांच्या वृत्तपत्रांचा आढावा घेत त्यांच्या भाषाशैलीवर प्रकाश टाकला. तत्कालीन संपादकांकडे नसलेली ओजस्वी शैली बाबासाहेबांनी वापरली. केसरीने मूकनायकची जाहिरात प्रसिद्ध करण्यास नकार दिला होता, यावरून त्या काळातील वृत्तपत्रे जातीय प्रभुत्वाच्या भूमिकेतून चालविली जात होती, हे स्पष्ट होते. मात्र बाबासाहेबांच्या लेखनाचा केंद्रबिंदू मानवता होता, असे त्यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना पत्रकार मधु कांबळे यांनी मूकनायक पुरस्कारासाठी निवड केल्याबद्दल आनंद व्यक्त केला. आपल्या मनोगतात त्यांनी बाबासाहेबांच्या अग्रलेखांचा संदर्भ देत सांगितले की, लोकशाहीचे तीन स्तंभ संविधानाच्या चौकटीत काम करतात; परंतु प्रसारमाध्यमे हा चौथा स्तंभ स्वातंत्र्य, समता, बंधुता या संवैधानिक मूल्यांच्या विरोधात काम करत असल्याबद्दल खंत व्यक्त केली. जातीव्यवस्था नष्ट झाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही, असे बाबासाहेबांनी सांगितले होते; परंतु सध्या विविध मार्गांनी हीच व्यवस्था बळकट करण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.आजच्या पत्रकारांनी बाबासाहेबांच्या पत्रकारितेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वैज्ञानिक दृष्टीकोन, विवेक आणि धर्मनिरपेक्षता या संवैधानिक मूल्यांवर आधारित पत्रकारिता करावी, असे आवाहन त्यांनी केले. एस. एस. भगत आणि डॉ. अरविंद गायकवाड यांनी बाबासाहेबांच्या पत्रकार व संपादक या पैलूंवर प्रकाश टाकला. सामाजिक चळवळीत प्रत्येकाने सहभाग देणे ही आपली जबाबदारी असून समतेच्या रथाला अधिक गती देणे आवश्यक असल्याचे प्रा. प्रदीप रोडे यांनी सांगितले.

शाक्यमुनि प्रतिष्ठानतर्फे 'मूकनायक' पुरस्कार देण्यामागील भूमिका अध्यक्षीय मनोगतातून प्रा. शरद वंजारे यांनी स्पष्ट केली. प्रास्ताविक प्रा. राम गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे बहारदार संचालन प्रा. अंकुश कोरडे यांनी केले, तर संतोष प्रधान यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य कृष्णा कांबळे, प्रा. प्रल्हाद तारू, प्रा. राजेंद्र भगत, प्रा. आश्मिता साळवे, ज्योती मोरे, स्वप्नाली सुतार, प्रज्ञा सोनवणे आणि पवन मस्के यांनी परिश्रम घेतले. विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# नदी पुनरुज्जीवन आणि प्लास्टिकमुक्त जलस्रोत राज्याचा प्राधान्यक्रम; जपानचे सहकार्य ठरणार मोलाचे - मंत्री पंकजा मुंडे




**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/पर्यावरण, वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी राज्यातील नद्यांचे पुनरुज्जीवन आणि जलस्रोत प्लास्टिकमुक्त करणे हा राज्य शासनाचा मुख्य प्राधान्यक्रम असल्याचे स्पष्ट केले आहे.

जपानच्या सागा प्रांताचे गव्हर्नर योशिनोरी यामागुची यांच्या नेतृत्वाखालील उच्चस्तरीय शिष्टमंडळाने आज मंत्री मुंडे यांची त्यांच्या 'रामटेक' या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. या बैठकीत पर्यावरण संरक्षण, प्लास्टिक मुक्ती, शिक्षण आणि पशुसंवर्धन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

जलप्रदूषण रोखण्यासाठी 'ज्ञान भागीदारी'

महाराष्ट्राला लाभलेल्या विस्तीर्ण समुद्रकिनाऱ्याचा उल्लेख करत मंत्री मुंडे यांनी समुद्रातून वाहून येणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याच्या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले. भारतीय संस्कृतीत नद्यांना अत्यंत पवित्र स्थान आहे, त्यामुळे नद्यांच्या स्वच्छतेसाठी शासन विशेष कार्यक्रम हाती घेणार आहे, असे त्यांनी सांगितले.

या प्रयत्नांना जपानच्या तांत्रिक ज्ञानाची जोड मिळणार आहे. गव्हर्नर यामागुची यांनी जपानमधील प्रगत संशोधन आणि व्यवस्थापन अनुभव महाराष्ट्रासोबत सामायिक करण्याची तयारी दर्शवली. आशियाई समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी ज्ञान भागीदारी (Knowledge Partnership) द्वारे संयुक्त उपक्रम राबविण्यावर दोन्ही देशांच्या प्रतिनिधींचे एकमत झाले.

शिक्षण आणि पशुसंवर्धन क्षेत्रातील संधी

बैठकीत केवळ पर्यावरणच नव्हे, तर इतर क्षेत्रांतील सहकार्यावरही भर देण्यात आला.शिक्षण: पर्यावरणीय शाश्वतता आणि पशुविज्ञानातील संशोधनासाठी परदेशी विद्यापीठांना महाराष्ट्रात संधी उपलब्ध करून दिली जाईल. विद्यार्थी देवाणघेवाण आणि संयुक्त संशोधनावरही चर्चा झाली.

पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय: जपानमधील दुग्धव्यवसायातील नवकल्पना आणि प्रगत तंत्रज्ञान महाराष्ट्रातील पशुपालकांसाठी उपयुक्त ठरू शकते.

सौंदर्यप्रसाधन उद्योग: या क्षेत्रात जपानचे तंत्रज्ञान जागतिक स्तरावर प्रगत असून, महाराष्ट्रात औद्योगिक सहकार्य वाढवण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

प्लास्टिक व्यवस्थापनाच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर काम करणाऱ्या 'वर्ल्ड ओशन प्लास्टिक प्लॅनिंग सेंटर'ला भेट देण्याचे अधिकृत निमंत्रण गव्हर्नर यामागुची यांनी पंकजा मुंडे यांना दिले. या भेटीमुळे भविष्यात तांत्रिक कार्यशाळा आणि दीर्घकालीन सहकार्य आराखडा तयार करण्यास मदत होईल.

या महत्त्वपूर्ण बैठकीला जपानच्या वतीने उपमहासंचालक मसाहिरो ओनो, कोजी योशिताके, कोकी कनामारू आणि जेट्रो सागाचे मुख्य संचालक हिरोशी योनेयामा उपस्थित होते.

तर महाराष्ट्र शासनाच्या वतीने पशुसंवर्धन सचिव डॉ. एन. रामास्वामी, पर्यावरण सचिव जयश्री भोज आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव देवेंद्र सिंह उपस्थित होते.

ही बैठक भारत आणि जपान यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधांना पर्यावरण संरक्षण आणि औद्योगिक विकासाच्या नव्या उंचीवर नेणारी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# अर्थसंकल्पातून सर्वसामान्यांच्या विकासाला नवी दिशा मिळेल- भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी १ फेब्रुवारी २०२६ रोजी संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ सादर केला. या अर्थसंकल्पातील केंद्र सरकारच्या धोरणांची, विकासात्मक दृष्टीकोनाची आणि सर्वसामान्य जनतेसाठी असलेल्या तरतुदींची माहिती देण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने वाघ्रूळ (ता. जालना) येथे प्रचार-प्रसार व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम आज (ता. ७) यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाला भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना दानवे म्हणाले, केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ हा देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा विकासाचा स्पष्ट आराखडा आहे. शेतकरी, कष्टकरी, मध्यमवर्ग, महिला आणि युवक यांना केंद्रस्थानी ठेवून हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, थेट लाभ हस्तांतरण यांसारख्या उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

तसेच पायाभूत सुविधा, रस्ते, रेल्वे, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील तरतुदी देशाच्या सर्वांगीण विकासाला गती देतील. देशाला आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम बनवणे हेच सरकारचे ध्येय आहे. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल त्यांनी किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सतीश केळकर व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले.

यावेळी भाजपा नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आणि भास्कर



आबा दानवे यांच्या उपस्थितीत इंदलकरवाडी (ता. जालना) येथील युवकांनी भाजपामध्ये जाहीर प्रवेश केला.

प्रवेश करणाऱ्यांमध्ये दिगंबर शेळके, सीताराम आसाराम इंदलकर, संपत गणपत इंदलकर, उद्धव विठोबा शिंदे, विजय राधाकिसन शेळके, सिताराम नारायण शिंदे, विष्णू भगवान घोलप, रामेश्वर ज्ञानोबा मोरे, सीताराम शामराव इंदलकर, शिवाजी गणपत इंदलकर, सोनाजी विठ्ठल इंदलकर, काशिनाथ शिंदे, नारायण घोलप, शंकर रामभाऊ इंदलकर, शिवाजी गायकवाड, बळीराम इंदलकर, विठ्ठल नारायण इंदलकर आदींचा समावेश होता.

कार्यक्रमास जिल्हा सरचिटणीस वसंतराव शिंदे, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, प. स. सदस्य गजानन खरात, सरपंच सुधाकर खरात, सरपंच विलास खरात, उपसरपंच गोविंद खरात, विष्णू डोंगरे, विठ्ठल इंदलकर, करण निकाळजे, नागेश अंभोरे, सतीश जारे, शाम खरात, शिवा पाटील खरात, विलासराव खरात, शेवाळे सर, रामजी खरात, शरद खरात, कैलास खरात, राधेश्याम खरात, गणेश शेवाळे, तुळशीदास शेवाळे, शिवाजी गायकवाड, अविनाश मोहिते, गणेश तिडके, संजय वैद्य, अमोल खांडेभराड, जगदीश खरात, दत्ता तिडके, लक्ष्मण खरात, जगन खरात, सुशील बोर्डे, प्रदीप खांडेभराड, करण निकाळजे आदींसह शेतकरी, युवक, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानेश्वर कंटुले यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती; कर्तव्यनिष्ठ सेवेला मानाचा मुजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** कर्तव्यदक्षता, शिस्तबद्ध कामकाज आणि दांडगा जनसंपर्क यांच्या बळावर पोलीस दलात वेगळी ओळख निर्माण करणारे ज्ञानेश्वर कंटुले (माऊली) यांना पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती मिळाली आहे. शहागड पोलीस चौकी येथे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकम्हणून कार्यरत असताना त्यांनी बजावलेल्या उल्लेखनीय सेवेमुळे ही पदोन्नती जाहीर करण्यात आली.

गृह मंत्रालयाच्या अपर सचिवांच्या विशेष आदेशानुसार ही पदोन्नती देण्यात आली असून, नव्या पदासोबत त्यांची नेमकी नियुक्ती कोणत्या ठिकाणी होणार हे अद्याप निश्चित झालेले नाही. मात्र, त्यांच्या पदोन्नतीमुळे अंबड तालुक्यासह संपूर्ण पोलीस वर्तुळात आनंद आणि अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

ज्ञानेश्वर कंटुले हे अभ्यासू, कर्तव्यदक्ष आणि लोकाभिमुख अधिकारी म्हणून ओळखले जातात. जनतेशी सलोख्याचे संबंध ठेवत त्यांनी अनेक संवेदनशील प्रकरणे यशस्वीरीत्या हाताळली आहेत. कर्तव्याप्रती निष्ठा, तत्परता आणि जनतेच्या विश्वासाला पात्र ठरणारी कार्यशैली यामुळे त्यांनी सहकाऱ्यांसह नागरिकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या पदोन्नतीला त्यांच्या प्रामाणिक सेवेला मिळालेली योग्य दाद मानली जात आहे.



सन २०१३ मध्ये त्यांनी स्पर्धा परीक्षेत यश मिळवले होते. वरिष्ठतेच्या आधारे त्यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड करण्यात आली आहे.या पदोन्नतीनंतर गोंदी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर, बालाजी पदमने साहेब तसेच जमादार रामदास केंद्रे, फुलचंद हजारे, गोपाल दिलवाले, चरणसिंग बामनावत, बाळासाहेब खवल आदी सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.मूळचे घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगाव येथील रहिवासी असलेले ज्ञानेश्वर कंटुले (माऊली) हे काही महिन्यांत सेवानिवृत्त होणार असल्याची माहिती आहे. सेवानिवृत्तीपूर्वीच त्यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेला दाद देत गृहशाखेने ही जबाबदारी सोपविल्याची चर्चा पोलीस वर्तुळात होत असून, त्यांच्या पदोन्नतीला त्यांच्या कार्याचा योग्य सन्मान मानला जात आहे.

# जवाहर नवोदय विद्यालयाची प्रवेश पूर्व निवड चाचणी परीक्षा शांततेत संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर (प्रतिनिधी)** जवाहर नवोदय विद्यालयातील इयत्ता नववी आणि अकरावीच्या रिक्त जागांसाठीची 'लॅटरल एन्ट्री' प्रवेश परीक्षा शनिवारी, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी जालना जिल्ह्यातील परतूर येथील केंद्रांवर अत्यंत शिस्तबद्ध आणि शांततेत पार पडली. जिल्हा प्रशासनाचे सूक्ष्म नियोजन आणि विविध विभागांच्या समन्वयामुळे कुठेही अनुचित प्रकार न घडता ही प्रक्रिया यशस्वी झाली.प्रशासकीय नियोजन आणि मार्गदर्शनजिल्हाधिकारी तथा विद्यालयाच्या अध्यक्षा आशिमा मित्तल आणि निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षेचे चोख नियोजन करण्यात आले होते. परीक्षेची पारदर्शकता टिकवण्यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली होती, अशी माहिती अंबा येथील जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य एस. जी. पवार यांनी दिली.परीक्षेची आकडेवारी: नववी आणि अकरावीया प्रवेश परीक्षेसाठी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. इयत्तानिहाय उपस्थितीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.इयत्ता एकूण नोंदणीकृत विद्यार्थीप्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थीअनुपस्थित विद्यार्थीपरीक्षा केंद्रे नववी (९ वी) स्वामी विवेकानंद विद्यालय आणि लाल बहादूर शास्त्री विद्यालय, परतूरअकरावी (११ वी) जिल्हा परिषद प्रशाला, परतूर आणि जवाहर नवोदय विद्यालय, अंबाविविध विभागांचा समन्वयही परीक्षा यशस्वी करण्यासाठी केवळ शिक्षण विभागच नव्हे, तर इतर प्रशासकीय यंत्रणांनीही मोलाची भूमिका बजावली:पोलीस प्रशासन: परीक्षा केंद्रांवर चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.महसूल विभाग: तहसीलदार आणि संबंधित कर्मचाऱ्यांचे परीक्षेवर विशेष लक्ष होते. शिक्षण व आरोग्य विभाग: ग्रामीण रुग्णालय, परतूर यांनी आपत्कालीन परिस्थितीसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या.यशस्वी आयोजनासाठी परिश्रमअंबा येथील जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य एस. जी. पवार यांच्यासह विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ही परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था, पेपर वाटप आणि इतर तांत्रिक बाबींचे नियोजन काटेकोरपणे करण्यात आले होते.सकाळच्या सत्रात पार पडलेल्या या परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार किंवा गोंधळ उडाला नसल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना नवोदय विद्यालयात प्रवेशाची संधी मिळावी, या उद्देशाने ही परीक्षा घेण्यात येते.

# सकारात्मक दृष्टीने जीवनाकडे बघा - माजी आरोग्यमंत्री राजेशभैय्या टोपे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/गणेश सपकाळ/** अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आरोग्यमंत्री राजेशभैय्या टोपे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी, बुलढाणा सुरेश कव्हळे यांची उपस्थिती लाभली. तसेच प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड आणि अजिंक्य टोपे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राजेश टोपे म्हणाले, मनाची शक्ती ही सर्वात मोठी शक्ती आहे. विचार, शब्द आणि कृती यांची सांगड घातली तर चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्व घडते. जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहा. नकारात्मक विचार दूर ठेवा आणि आत्मविश्वासाने यशाकडे वाटचाल करा.



ते पुढे म्हणाले, *दुसऱ्याचे व्यवस्थापन करण्यापेक्षा स्वतःचे व्यवस्थापन करायला शिका. परिस्थिती कशीही असली तरी आशावादी राहा. संकटांना न घाबरता सामोरे जा. स्मार्ट कौशल्ये आत्मसात करून रोजगाराच्या संधी शोधा. कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर करा. आई-वडिलांचे संस्कार आणि त्यांची स्वप्ने पूर्ण करण्याची जाणीव ठेवा.

प्रमुख पाहुणे सुरेश कव्हळे यांनी विद्यार्थ्यांना अपयशाने खचून न जाता परिस्थितीशी जुळवून घेत करिअरची सुरुवात करण्याचा सल्ला दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांनी केले. वार्षिक स्नेहसंमेलनातील विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

तसेच शैक्षणिक वर्षात विशेष प्राविण्य मिळवलेल्या प्राध्यापकांचा डॉ. रामदास वैद्य, प्रा. मनोरमा पात्रे, डॉ. शिवकन्या वाडेकर, डॉ. शकुंतला मस्के, डॉ. सुजाता पाटील, प्रा. कांचन मुळे, डॉ. सुजाता देवरे, डॉ. भुजंग डावकर, डॉ. शंकर तिकांडे यांचा सत्कार करण्यात आला. विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवात यशस्वी विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभापूर्वी विद्यार्थ्यांनी साधे व संगीत शेलापागोटे या कार्यक्रमांचा मनमुराद आनंद घेतला. महाविद्यालयाच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुदर्शन तारख यांनी केले, तर आभार प्रदर्शन विद्यार्थी संसद सचिव पायल पानसरे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे, पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रामनाथ सांगोळे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भुजंग डावकर, विद्यार्थी संसद प्रमुख डॉ. पंडित रानमाळ, श्री. सुरेश चव्हाण तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सरस्वती भुवन प्रशाला, रांजणी येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (विशेष प्रतिनिधी)** माय भारत, श्री सरस्वती भुवन प्रशाला आणि क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन श्री सरस्वती भुवन प्रशाला, रांजणी येथे मोठ्या उत्साहात पार पडले.

या क्रीडा स्पर्धा प्रणित सांगवीकर, जिल्हा युवा अधिकारी (माय भारत) यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. महाजन सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रणित सांगवीकर, जिल्हा युवा अधिकारी (माय भारत) तसेच सच्छितानंद जहागीरदार, क्रीडा शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाला शाळेतील शिक्षकवृंद, क्रीडा प्रशिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये १०० मीटर धावणे (मुले व मुली), गोळाफेक (मुले व मुली) आणि खो-खो (मुले व मुली) अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील विविध शाळांमधील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांमध्ये खेळाबद्दलची आवड, जिद्द आणि खेळाडूवृत्ती प्रकर्षाने दिसून आली. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सुदाम तांबोळकर, ऋषिकेश जाधव आणि किरण थोरात यांनी क्रीडा परीक्षक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी विजयी खेळाडूंना ट्रॉफी, मेडल आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना आणि स्पर्धात्मक वृत्ती वाढीस लागल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.



# जालना शहरात बालाजी महाराजांची मिरवणूक मोठ्या उत्साहात; उद्या रंगणार शाही विवाह सोहळा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (विशेष प्रतिनिधी)** नवीन जालन्यातील रामनगर भागातील सुप्रसिद्ध बालाजी संस्थानच्या वतीने आयोजित वार्षिक महोत्सवाने आज अवघे शहर भक्तीमय झाले आहे. निमित्त होते बालाजी महाराजांच्या भव्य पालखी मिरवणुकीचे. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि 'गोविंदा-गोविंदा'च्या जयघोषात आज ही मिरवणूक काढण्यात आली.

## भक्तीचा महाकुंभ!

मिरवणुकीचे विशेष आकर्षण

रामनगर येथील बालाजी मंदिरातून निघालेल्या या मिरवणुकीत भाविकांचा जनसागर उसळला होता. पारंपारिक वाद्यांचा गजर, टाळ-मृदंगाचा नाद आणि फुलांनी सजवलेला बालाजी महाराजांचा रथ आकर्षणाचे केंद्र ठरला. महिलांनी ठिकठिकाणी रांगोळ्या काढून आणि आरती ओवाळून महाराजांचे स्वागत केले. तरुणाईचा उत्साह आणि अबालवृद्धांची श्रद्धा यामुळे संपूर्ण रामनगर परिसर भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाला होता.

उद्या रंगणार शाही 'विवाह सोहळा'

मिरवणुकीचा हा उत्साह उद्या होणाऱ्या मुख्य सोहळ्याची नांदी मानली जात आहे. उद्या बालाजी महाराजांचा विवाह सोहळा संपन्न होणार असून, प्रशासकीय आणि मंदिर समितीच्या वतीने या शाही सोहळ्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे.

विवाहाचे ठिकाण: बालाजी संस्थान, रामनगर, जालना.नियोजन: भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन आणि विशेष बैठक व्यवस्था.थाट: हा विवाह सोहळा एखाद्या भव्य शाही लग्नाप्रमाणे पार पाडण्यासाठी विशेष सजावट करण्यात आली आहे.

भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन

बालाजी संस्थानच्या वतीने या विवाह सोहळ्यासाठी जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहून दर्शनाचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. आजच्या मिरवणुकीने शहरात एक वेगळीच चैतन्यमय ऊर्जा निर्माण केली असून, आता सर्वांच्या नजरा उद्याच्या मुख्य सोहळ्याकडे लागल्या आहेत.

फोटो सौजन्य: किरण खानापुरे

# सेशेल्सचे राष्ट्रपती डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांचे मुंबईत आगमन; विमानतळावर भव्य स्वागत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबइ/प्रतिनिधी/**भारत आणि सेशेल्स यांच्यातील द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने, सेशेल्स प्रजासत्ताकचे राष्ट्रपती डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांचे आज मुंबईत आगमन झाले. त्यांच्यासोबत सेशेल्सच्या प्रथम महिला श्रीमती व्हेरॉनिक हर्मिनी आणि एक उच्चस्तरीय शिष्टमंडळही उपस्थित आहे.

विमानतळावर जंगी स्वागत

आज सकाळी ठीक ११.५५ वाजता राष्ट्रपतींचे विमान मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर लँड झाले. विमानतळावर त्यांचे स्वागत करण्यासाठी राज्य सरकारतर्फे विशेष व्यवस्था करण्यात आली होती. महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राष्ट्रपती आणि त्यांच्या पत्नींचे पुष्पगुच्छ देऊन उत्साहात स्वागत केले.या स्वागत समारंभाप्रसंगी प्रशासकीय आणि राजनैतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते, ज्यामध्ये प्रामुख्याने खालील व्यक्तींचा समावेश होता.

रोहित रथिश: भारताचे सेशेल्समधील उच्चायुक्त,परमजीत सिंह दहिया,अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. राजेश गवांड, सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी,सौरभ कटियार: जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर,डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांचा हा दौरा भारत आणि सेशेल्स या दोन्ही देशांमधील मैत्रीपूर्ण संबंधांना नवीन उंचीवर नेण्यासाठी



अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. मुंबई भेटीदरम्यान ते काही महत्त्वाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याची शक्यता असून, याद्वारे दोन्ही देशांतील व्यापार, पर्यटन आणि सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. विमानतळावरील औपचारिक स्वागतानंतर राष्ट्रपतींचे शिष्टमंडळ त्यांच्या पुढील नियोजित कार्यक्रमांसाठी रवाना झाले. त्यांच्या या दौऱ्यामुळे हिंदी महासागर क्षेत्रातील सुरक्षा आणि सहकार्य या विषयांवरही सकारात्मक चर्चा अपेक्षित आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813